संदर्भ :- 1. म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील कलम 4(6)
2. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी यांचा अहवाल जाक्र पंसदे/कार्या2/कावि410दि.13/8/2013
3. या कार्यालयाची नोटीस दिनांक 20/8/2013, दि.3/9/2013, दि.26/11/2013
4. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस दि.15/01/2014 व दि.02/04/016
5. म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 6(2) अन्वये दिलेली अंतिम कारणे दाखवा नोटीस दि.23/7/2014
6. श्रीम.कुरुकवाड कविता गोविंद यांचा खुलासा दि.20/8/2014
7. गट विकास अधिकारी, पं.स.देवणी यांचे पत्र जाक्र पंसदे/ग्रापवि/कार्या-2/451/14 दि.8/9/2014
8. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांचे आदेश जाक्रजिपला/पसं/कार्या-1/सीआर61/कावि61/16 दि.19/01/2016
9. विशेष चौकशी अधिकारी, जि.प.लातूर यांनी दिलेली सुनावणीची नोटीस दि.29/02/2016, दि.10/3/2016 व दि.17/3/2016
10. या कार्यालयाचे पत्र दिनांक 10/3/2016,दि.18/3/2016
11. गट विकास अधिकारी, पं.स.देवणी यांचा तामील अहवाल जाक्रपंसदे/का-1/सीआर81 दि.21/3/2016
12. विशेष चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक 31/03/2016
13. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस दि.08/09/2016
14. गट विकास अधिकारी, पं.स.देवणी यांचा तामील अहवाल जाक्रपंसदे/का-1/सीआर दि.21/9/2016
15. मान्य टिपणी दिनांक 23/10/2016

जाक्र2016/जिपला/पशुसं/कार्या-2/सीआर- /कावि-819
पशुसंवर्धन विभाग, जि.प.लातूर
दिनांक :-17/11/2016
19

**आदेश**

श्रीमती कुरुकवाड कविता गोविंदराव, पशुधन पर्यवेक्षक पं.स.देवणी ह्या दिनांक 31/07/2013 पासून कार्यालयास कोणतीही पुर्वसूचना न देता अनाधिकृतरित्या गैरहजर असल्याबाबत संदर्भ क्र.2 अन्वये ग.वि.अ. पं.स.देवणी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार या कार्यालयाने संदर्भ 3 व 4 अन्वये अनाधिकृत गैरहजेरीचा खुलासा मागविला. परंतू, संबंधितांनी खुलासा सादर केला नाही. तसेच संदर्भ 5 अन्वये, संबंधितास खाते चौकशी प्रस्तावित का करण्यात येऊ नये? याबाबत म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 6(2) अन्वये देण्यात आलेल्या नोटीसीचे उत्तरी संदर्भ 6 अन्वये श्रीम.कुरुकवाड यांनी वैद्यकिय सल्ल्यानुसार कार्यालयास उपस्थित नसल्याबाबत व गैरहजर कालावधीची रजा मंजूर करण्याबाबत खुलासा अति विलंबाने सादर केला.परंतू, सादर केलेल्या वैद्यकिय उपचाराच्या कागदपत्रावरून त्यांना दीर्घकाळ अनुपस्थित राहण्याची आवश्यकता नसल्याचे दिसून आले. तरीही श्रीम.कुरुकवाड ह्या कामावर हजर झाल्या नाहीत.

संबंधिताचा खुलासा अमान्य करून संदर्भ 8 अन्वये संबंधिताविरूध्द म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 6(3) नुसार विभागीय चौकशी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले.सदर आदेशानुसार विशेष चौकशी अधिकारी यांनी व या कार्यालयानी संदर्भ 9 व 10 नुसार चौकशीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याविषयी नोटीस देण्यात आली.ज्याचा तामील अहवाल, संदर्भ 11 अन्वये ग.वि.अ.पं.स.देवणी यांचेकडून प्राप्त झाला.श्रीमती कुरुकवाड ह्या चौकशीच्या कोणत्याही सुनावणीस उपस्थित न झाल्याने विशेष चौकशी अधिकारी, जि.प.लातूर यांनी संदर्भ 12 अन्वये, अपचारी कर्मचारी श्रीमती कुरुकवाड कविता गोविंदराव, पशुधन पर्यवेक्षक, पं.स.देवणी ह्या अनाधिकृतपणे गैरहजर राहणे या आरोपात दोषी असल्याचे सिध्द झाल्याचे कळविले.

सदर प्रकरणी संबंधितास अंतिम कारणे दाखवा नोटीस द्वारे म.जि.प.जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील कलम 4(6) नुसार सेवेतून कमी करण्याची शास्ती का करण्यात येऊ नये? याबाबतची 21 दिवसाच्या मुदतीची नोटीस संदर्भ 13 अन्वये चौकशी अहवालाच्या प्रतीसह बजावण्यात आली.तथापि, नोटीस तामील होऊनही संबंधितांनी कसलाही खुलासा सादर केलेला नाही.

सबब,संदर्भ 15 च्या मान्यतेनुसार, श्रीमती कुरुकवाड कविता गोविंदराव यांना सेवेची आवश्यकता नसल्याचे दिसून येत असल्याच्या कारणावरून संबंधितास पशुधन पर्यवेक्षक या पदावरून **जि.प.सेवेतून काढून टाकण्याची शास्ती देण्यात येत आहे.** सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही अनुसरावी.

स्वाक्षरीत

(स्थळ प्रत मा.मु.का.अ. यांचे स्वाक्षरीत)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, लातूर करीता**

प्रति,

श्रीमती कुरुकवाड कविता गोविंदराव,
रा.अरूणोदय निवास, समतानगर,
फावडेवाडी नाका, नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव

1. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
3. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा), जिल्हा परिषद, लातूर
4. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
5. गट विकास अधिकारी, पंचायत समिती देवणी
6. पशुधन विकास अधिकारी(वि), पंचायत समिती देवणी

(स्थळ प्रत मा.मु.का.अ. यांचे स्वाक्षरीत)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, लातूर करीता**

जा क्र 960 / 2/11/16

कार्य 2 / 2/11/16